# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 30/06/2020 (मंगळवार)
(सायंकाळ)

**पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त**
**पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप**

दिनांक 30/06/2020 रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका ''निरोप समारंभाच्या'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या 1) पोलिस उपनिरीक्षक श्री दिलीप रामचन्द्र चुटे, आर्थिक गुन्हे शाखा, ना.ग्रा. 2) सहायक फौजदार श्री कवडु लक्ष्मणराव चौधरी, पोलिस स्टेशन कुही, 3) सहायक फौजदार श्री रमाकांत देवराव बावीसकर, पीसीआर, 4) सहायक फौजदार श्री महेश बाबूलाल नोरीया, पोलिस स्टेशन रामटेक, 5) सहायक फौजदार श्री रमेश दयाशंकर वाडबुधे, पोलिस स्टेशन पारशिवनी, 6) सहायक फौजदार श्री भारत हिरालालसिंग ठाकुर, नियंत्रण कक्ष, 7) सहायक फौजदार श्री बबन गणपतराव पडसपगार, पोलीस मुख्यालय ना.ग्रा, 8) सहायक फौजदार श्री सुरेश मिठ्ठुजी निमसडे, पोलीस मुख्यालय ना.ग्रा, 9) पोलीस हवालदार श्री दिपक भगवान वासनिक, जिल्हा विशेष शाखा, 10) पोलीस हवालदार श्री मनोहर आनंदराव दुबे, पोलीस मुख्यालय ना.ग्रा, यांना पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस अधीक्षकांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, प्रभारी पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री संजय पुरंदरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार व मानव संसाधन शाखेचे पोलीस निरीक्षक श्री वंजारी हे उपस्थित होते.

## पोलीस स्टेशन अरोली परिसरात रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर (ग्रामीण), ची कार्यवाही

दिनांक 30/06/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पथक रामटेक उपविभागात गुन्हे प्रतिबंध संबंधाने रात्र गस्त करित असतांना, पहाटे 06:00 वाजताच्या सुमारास गुप्त बातमीदारा कडून खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली की, ''मौजा वाकेश्वर येथील सूर नदीच्या पत्रातून काही लोक अवैद्य उत्खनन करून रेती चोरी करीत आहेत.'' अशा प्राप्त माहितीची योग्य खातरजमा करुन स्थानिक गुन्हे शाखाचे पथक घटनास्थळी जाऊन रेड केली असता आरोपी क्र. 1) अरुण श्यामराव बोन्द्रे, वय 40 वर्ष, रा. श्रीखंडा आणि आरोपी क्र. 2) स्नेहल प्रकाश दिवे, वय 33 वर्ष, रा. इजनी दोन्ही तह. मौदा जि. नागपूर हे सूर नदी पत्रामध्ये अवैद्य उत्खनन करून विना क्रमांकाच्या 2 ट्रॅक्टर व ट्रॉली मध्ये एकुण अर्धा ब्रास रेती कि. 2,000/–रू. वाहनात भरतांना मिळून आले. दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरी करण्यात आलेली रेती, तसेच रेती उत्खनन करिता वापरलेली संसाधने असा एकूण 11,07,400/– रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 34 भा.द.वि. अन्वये नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. पुढिल कायदेशीर कार्यवाही करिता आरोपीतांना पोलिस ठाणे आरोली यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोऊपनी सचिन मत्ते, पोहवा राजेंद्र सनोडीया, पोना दिनेश आधापुरे, पोशि अमोल वाघ, विपीन गायधने, महेश बिसने यांचे पथकाने पुर्ण केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर